# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**३२वा मजला, सेंटर - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५.**

दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७ फॅक्स :(०२२)२२१५१८६७ ई मेल: info.mahasecurity@maharashtra.gov.in


जा.क्र./मरासुम/भरती/ २०००/२०२२ दिनांक : ०८/०९/२०२२

**: महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ सुरक्षा रक्षक (कंत्राटी) अंतिम निवड व प्रतिक्षाधीन यादी (नामिका सुची) 2020 :-**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळा मार्फत 7000 पुरुष सुरक्षा रक्षकांची (कंत्राटी) प्रतीक्षाधीन यादी 2020 च्या जाहिरातीनुसार दि. 20/08/2022 ते दि. 05/09/2022 दरम्यान रारापोबल गट क्र. 1, 3, 4, 5, 7, 9, 11 व 14 या भरती केंद्रावरती भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती.

सदर भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवारांना भरती प्रक्रियेतील निकष चाचणीनुसार मिळालेल्या गुणांची एकत्रित माहीती ही यापुर्वी उपलब्धतेनुसार मरासुम च्या संकेत स्थळावरती प्रसिध्द करण्यात आली होती. नमुद भरती प्रक्रिया कार्यपध्दतीतील निर्देशानुसार फेर पडताळणी करुन तसेच प्राप्त झालेले आक्षेप, हरकतीची पुर्तता करुन महामंडळाच्या निवड समितीच्या मान्यतेने अंतीम गुणवत्ता निवड यादी व प्रतिक्षाधीन (नामिका सुची यादी) खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

अंतिम गुणवत्ता यादी व प्रतिक्षाधीन (नामिका सुची) यादीतील उमेदवारांनी जाहिराती मधील महत्वाच्या सुचना व अटींच्या अनुषंगाने शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणती वस्तुस्थिती निदर्शक माहीती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहीती दिल्यास उमेदवारांची झालेली निवड रद्द करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल, त्याबाबत उमेदवराचा कोणताही दावा / तक्रार / हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अंतिम निवड यादीतील निवड करण्यात आलेल्या उमेदवारांची शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे संबंधींत विभागाकडून पडताळणीच्या अधिन राहून करण्यात येत आहे. अंतिम निवड यादीतील निवड झालेले उमेदवार पुढील टप्प्यावर अगर कोणत्याही कारणास्तव अपात्र झाल्यास किंवा उपलब्ध न झाल्यास प्रतिक्षाधीन (नामिका सुची ) यादीतील उमेदवारांचो निवड प्रसिध्द केलेल्या पुढील अनुक्रमांका नुसार करण्यात येईल.

सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल /निर्णय घेण्याचा अधिकार हा महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

मुंबई :
दिनांक : ०८/०९/२०२२

08/09/22
(अश्विनी सानप)
पोलीस अधिक्षक तथा महाव्यवस्थापक
(प्रशासन/ वित्त/ भरती व प्रशिक्षण)
अतिरिक्त कार्यभार उप व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई